हजार ते पाच लक्ष पर्यंतच्या खरेदीस रक्कम रुपये.पाचश
रुपये.तीनशे फक्त

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह

कै. बा. दे. दवाखाना
म.न.पा. अहिल्यानगर
जावक नं.- २६५
दिनांक :- १८/८/२०२६

## जाहिर कोटेशन नोटीस

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखान्यातील रुग्णांना आहार पुरविणेच्या कामाचे स्थानिक व्यावसाय धारकाकडुन कोटेशन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याकरिता दि.१८/०८/२०२६ ते दि.२५/०८/२०२६ पर्यंत दुपारी १:०० वाजेपर्यंत कोटेशन कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे स्विकारण्यात येतील.

कामाचे नाव :- अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखान्यातील रुग्णांना आहार पुरविणे.

| अ.क्र. | वेळ | आहाराचा तपशील | प्रति दिवशी / प्रति रुग्ण दर रू. |
|---|---|---|---|
| १ | सकाळचा नाष्टा | १. कांदा पोहे / उपीट / २ इडल्या खोबरा चटणी / गव्हाची लापशी (गुळाची) / रव्याचा शिरा या पैकी एक<br>२. ५० मि.ली. दुध (देशी गाईचे) | |
| २ | दुपारचे जेवन | १) २ पोळी किंवा तीन फुलके (गव्हाचे)<br>२) वरण (तुरदाळ + मुगदाळ) फोडणीचे वरण<br>३) सुकी भाजी<br>४) भात<br>५) शेंगदाण्याची चटणी | |
| ३ | रात्रीचे जेवन | १) मुगदाळ किंवा मुगाची फोडणीची खिचडी<br>२) सुकी भाजी किंवा पातळ भाजी<br>३) २ पोळी किंवा तीन फुलके किंवा १ भाकरी<br>४) शेंगदाण्याची चटणी | |

अटी व शर्ती :-

१) संस्थेची नोंदणी मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये / मा. अन्न आणि औषध सौदर्य प्रशासन कायदा १९४५ अन्वये नोंदणी / धर्मदाय आयुक्त संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये / सुवर्ण जयंती रोजगार योजन मनपा अहिल्यानगर या पैकी एका विभागाकडे नोंद असलेचे प्रमाणपत्र

२) अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ व त्याखालील अधिनियम २०११ नुसार परवाना नोंदणी प्रमाणपत्र

३) मागील दोन वर्षाचे आयकर भरलेले विवरण पत्र

४) संस्थेचे बँक खाते पासबुकची झेरॉक्स व पॅनकार्डची झेरॉक्स

५) कै.बा.दे.दवाखाना येथे स्वंयपाक घर (किचन) ची व्यवस्था होईपर्यंत सर्व अन्न पदार्थ संस्थेने किचन मध्ये तयार करुन पोहच करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

६) संस्थेने पुरवयाच्या आहाराकरीता वापरण्यात येणारे सर्व पदार्थ ताजे , स्वच्छ , निवडलेले दर्जेदार, असावे.

७) अन्न पदार्थ ने-आण करतांना सर्व अन्न स्वच्छ भांड्यात झाकुन आणण्याचे काम संबंधीत संस्थेवर बंधनकारक राहील.

८) महानगरपालिकेने प्राधिकृत केलेल्या अधिकारीने (आहारतज्ञ) बनविलेले अन्न पदार्थाच्या दर्जाबाबत काहीही अक्षेप घेतल्यास सदरचे अन्न पदार्थ तात्काळ पुन्हा बनवुन देण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील. तसेच रद्द केलेल्या अन्न पदार्थाचा खर्च महानगरपालिकेस देय राहणार नाही. कोणत्याही कारनाने नाकारलेले अन्न पदार्थ त्वरीत नष्ट करणे आवश्यक राहील.

९) संस्थेने बनविलेल्या अन्न पदार्थापासुन रुग्णास विषबाधा अथवा तत्सम प्रकारचा त्रास झाल्यास व रुग्णाच्या जिवितास धोका निर्माण झाल्यास त्यास संबंधीत संबंधीत संस्था पुर्णपणे जबाबदार राहील. तसेच अशा रुग्नास लागणा-या पुढील वैद्यकीय खर्चाची जबाबदारी संबंधीत संस्थेवर राहील. महानगरपालिकेची राहणार नाही.

१०) कच्चे व बनविलेल्या अन्नाचे नमुने तपासणी करिता घेण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील. तसेच संबंधीत संस्थेने पुरविलेल्या अन्नाचे नमुने दैनंदीन रित्या घेऊन कै.बा.दे.द्वाखाना येथे पुढील २४ तासांपर्यंत राखुन ठेवण्यात येतील.

११) बनविलेले अन्न पदार्थ रुग्णांपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

१२) बनविलेले अन्न नाष्टा सकाळी ८:०० वाजता, दुपारचे जेवन दु.१२:०० वाजता व रात्रीचे जेवन रा.७:०० वाजता रुग्णांना पोहच करणे बंधन कारक राहील.

१३) दैनंदीन आहार पुरविणेकामी रुग्णांच्या संख्येबाबतची माहीती नाष्ट्या करिता सकाळी ६:०० वाजता, दुपारच्या जेवणाचे सकाळी १०:०० वाजता व रात्रीचे जेवनाची माहीती दु.४:०० वाजता मेट्रन कै.बा.दे.दवाखाना यांच्याकडुन संबंधीत संस्थेने दररोज तीन वेळेस घेणे बंधनकारक राहील.

१४) या कराराच्या अटी व शर्ती याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांचा निर्णय अंतीम राहील.

१५) प्रदान (Payment) :-

दरमहा केलेल्या कामाचे बील प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपुर्वी कै.बा.दे.दवाखाना येथे सादर केल्यानंतर मनपाच्या निधी उपलब्धतेनुसार नियमानुसार प्रासकीय पुर्तता करुन बील लेखा विभागामार्फत अदा केले जाईल.

Digitally signed by
Lahare Meher Gangadhar
Date: 20-03-2026
16:14:30

उपायुक्त (आरोग्य)

अहिल्यानगर महानगरपालिका

संगणक विभाग

प्रत :- ई-निविदा कक्ष, सदर नोटीस मनपा संकेतस्थळा वर प्रसिध्द करणे बाबत

प्रत :- प्रसिध्दी विभाग, सदर कोटेशन नोटीस स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे बाबत.

प्रत :- मेट्रन, कै.बा.दे.दवाखाना सदर नोटीस नोटीस बोर्डवर डकवणे बाबत